**SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004**
Phone : EPABX –2609000 Special Cell –260 9148
Website : www.unishivaji.ac.in Email : spcell@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४
फोन इपीबीएक्स. २६०९००० विशेष कक्ष २६०९१४८
Estd : 1962
"A++" Accredited by NAAC(2021) With CPA 3.52

जा.क्र.विशेष कक्ष/CHB/2022/23/856/समज दिनांक 1 AUG 2022

प्रति,

मा. प्राचार्य,
श्री शिव—शाहू महाविद्यालय, सरुड
ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर.

विषय : स्थानिक निवड समितीमार्फत केवळ तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावरील शिक्षक पदांच्या जाहिरात मान्यतेबाबत...

संदर्भ:— १.शासननिर्णय क्र.संकिर्ण/२०१८/( १८५/१८)/मशि—३ दि.१४/११/२०१८
२.शासननिर्णय बीसीसी—२०२१/प्र.कं.३८७/१६—ब(ए),दि.०६.०७.२०२१
३.शासननिर्णय बीसीसी—२०२१/प्र.कं.८३५/१६—ब, दि. २५.०२.२०२२
४.जा.कं.विससं/कोवि/सांगली अनु./२०२२—२३/३६१५, दि.०८/०७/२०२२
५.जा.क्र.विससं/उशि/कोवि/अनि—१/२०२२—२३/३७१० दि.१३/०७/२०२२ चे तासिका तत्वावरील प्राध्यापकांच्या नेमणुकाचे ना—हरकत प्रमाणपत्राबाबतचे पत्र
६.श्री शिव—शाहू महाविद्यालय, सरुड, शाहूवाडी यांचा प्रस्ताव जा.क्र.एसएसएसएम/एसआर/१०८/२०२२—२३ दि.२५/०७/२०२२.

महोदय,

उपरोक्त संदर्भाकीत जाहिरात प्रस्तावाबाबत आदेशावरून कळविण्यात येते की,

१. आपण सादर केलेला तासिका तत्वावरील (CHB) शिक्षक पदांचा जाहिरातीचा मसुदा दुरूस्तीसह मान्य करून सोबत प्रमाणे पाठविण्यात येत आहे.
२. स्थानिक निवड समितीमार्फत केवळ तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर शिक्षक पदे भरण्यासंदर्भातील सोबतची जाहिरात ही स्थानिक जिल्हास्तर पातळीवर व विद्यापीठ आणि संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावी. विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करण्यासाठी संस्थेने रू. २१४३/— शुल्कासह मा. समन्वयक, इंटरनेट कक्ष, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना जाहिरात पाठवावी.
३. संस्थेने जाहिरात प्रस्तावान्वये मागणी केल्यानुसार तासिका तत्त्वावरील पदे वॉक—इन—इंटरव्हयू (समक्ष मुलाखत) द्वारे भरण्यासाठी जाहिरात मान्यता देण्यात आली आहे.
४. सदरची तासिका तत्वावरील पदे भरत असताना एखाद्या मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर होणारे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी इतर अन्य उपलब्ध मागास प्रवर्गातील उमेदवाराचा 'मुलाखतीमधील प्राविण्यावर आधारीत' तात्पुरत्या नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल, असे आदेशान्वये कळविण्यात येत आहे.
५. संस्था/महाविद्यालय यांनी तात्पुरत्या स्वरूपात भरावयाची सोबतच्या जाहिरात मसुद्यातील तासिका तत्वावरील शिक्षक पदांची भरती या संदर्भातील सर्व शासन नियमांचे काटेकोर पालन करून करावयाची आहे. तासिका तत्वावरील मंजूर पदे आणि त्यांच्या आरक्षणाबाबत विद्यापीठास जाणीवपूर्वक अथवा नजरचूकीने चूकीची माहिती देवून जाहिरात आणि पदभरती संदर्भातील कार्यवाही केल्यास त्यास सर्वस्वी संबंधीत संस्था/महाविद्यालय जबाबदार राहील.
६. श्री शिव—शाहू महाविद्यालय, सरुड, शाहूवाडी या महाविद्यालयातील तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावरील शिक्षक पदांच्या जाहिरातीस आदेशान्वये मान्यता देण्यात आली आहे. तथापि, या जाहिरातीसंदर्भात कोणत्याही प्रकारची तक्रार/हरकत विद्यापीठास रास्त वाटल्यास मंजूर करून दिलेली जाहिरात तात्काळ रद्द करण्यात येईल.
७. शासनाकडून वेळोवेळी अंमलात येणाऱ्या सूचना, अधिसूचना, अधिनियम, परिपत्रके/शासन निर्णय व वरील संदर्भ या सर्वातील अटी महाविद्यालयास/संस्थेस लागू राहतील याची नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,
PSPande
उपकुलसचिव

उपकुलसचिव
विशेष कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रत : संलग्नता टी१/टी२/प्लेसमेंट सेल/लेखा विभाग/इंटरनेट कक्ष

श्री शिव - शाहू महाविद्यालय, सरुड
आवक नं. SR.NO: 505/2022-23
दिनांक 02-08-2022
फाईल नं.
सही

माजी आमदार श्री.बाबासाहेब पाटील सरुडकर शिक्षण संस्था

# श्री शिव—शाहू महाविद्यालय, सरुड

ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर

पा हि जे त

समक्ष मुलाखती (**Walk-in-Interview**)

**संस्थेमध्ये चालू शैक्षणिक वर्षाकरिता स्थानिक निवड समितीमार्फत केवळ तात्पुरत्या स्वरुपात तासिका तत्वावर (CHB) खालील विषयांची शिक्षक पदे भरावयाची आहेत :**

| अ. क्रं. | विषय | ना—हरकत देणेत आलेली पदे | तासिका तत्वावरील एकूण भरावयाची पदे | ना—हरकत देणेत आलेल्या पदांचे आरक्षण |
|---|---|---|---|---|
| **अ) सहाय्यक प्राध्यापक** | | | | |
| १. | इंग्रजी | २ | ३२ | सदर विषयाच्या पदांकरिता<br>अजा—४, अज—२,विजा अ—१, भजब—१, भज क—१, भज ड—१, विमाप्र—१,इमाव—६, आदुघ—३ व अराखिव—१२ असे आरक्षण निर्धारित करण्यात आले आहे. |
| २. | मराठी | ४ | | |
| ३. | अर्थशास्त्र | ६ | | |
| ४. | राज्यशास्त्र | ४ | | |
| ५. | भूगोल | ३ | | |
| ६. | समाजशास्त्र | २ | | |
| ७. | इतिहास | ४ | | |
| ८. | हिंदी | २ | | |
| ९. | वाणिज्य | २ | | |
| १०. | बिझनेस लॉ | १ | | |
| ११. | संख्याशास्त्र | १ | | |
| १२. | शा.शि.संचालक | १ | | |

**शर्ती व अटी :**

१. उपरोक्त तासिका तत्वावरील पदे महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने निर्गमित केलल्या क्र. संकीर्ण—२०१८/(१८५/१८)/मशि—३ दि. १४.११.२०१८ रोजीच्या शासन निर्णयातील निर्देशानुसार केवळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्यात येत असून या शासन निर्णयातील सर्व अटी व शर्ती उपरोक्त पदे भरण्यासाठी लागू आहेत.

२. उपरोक्त तासिका तत्वावरील पदे भरण्यासाठी मा. विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांनी जा. क्र. विससं/उशि/कोवि/अनि—१/तासिकामान्यता/२०२२/३७१० दि. १३/०७/२०२२ अन्वये ना—हरकत प्रमाणपत्र दिलेले असून त्यानुसार ही जाहिरात देण्यात येत आहे. शासनाच्या या ना—हरकत प्रमाणपत्रातील सर्व अटी व शर्ती उपरोक्त पदे भरण्यासाठी लागू आहेत.

३. तासिका तत्वावरील शिक्षकांची (**CHB**) एका शैक्षणिक वर्षासाठी जास्तीत जास्त ०९ महिन्यांसाठी अत्यंत तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती करण्यात येईल व तदनंतर सदरची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. त्यामुळे नियमित सेवेचे कोणतेही हक्क तासिका तत्वावरील नियुक्त शिक्षकास प्राप्त होत नसून भविष्यात कायम करण्याची मागणी/नियमित सेवेच्या कोणत्याही हक्काची मागणी त्यास करता येणार नाही.

४. शासनाने दिलेल्या निर्देशानुसार नेमलेल्या शिक्षकाने एकावेळी एकाच महाविद्यालयात काम करत असल्याबाबतचे, इतर महाविद्यालयामध्ये काम करत नसल्याबाबतचे हमीपत्र रु. १०० च्या स्टॅप पेपरवर संस्था/महाविद्यालय यांना सादर करणे आवश्यक आहे.

५. उपरोक्त पदांसाठीच्या शैक्षणिक अर्हता, तासिका तत्वावरील वेतन तसेच आरक्षणाबाबतीतील अंतर्गत परिवर्तनीय व अदलाबदल इ. यासंदर्भातील बाबी शासन नियमानुसार राहतील. तथापी जाहिरातीतील मुळ संवर्गाचा उमेदवार उपलब्ध असेल तर त्यास अंतर्गत परिवर्तनीय/अदलाबदल अनुषंगीक बदल अनुज्ञेय राहणार नाही.

६. महाराष्ट्र राज्याबाहेरील मागासवर्गीय उमेदवारांची गणना खुल्या/अराखीव प्रवर्गात केली जाईल. आरक्षणांतर्गत अर्ज करु इच्छिणाऱ्या महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय उमेदवारांनी अर्जासोबत शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र इत्यादि कागदपत्रे सादर करावीत.

७. सदरची तासिका तत्वावरील पदे भरत असताना एखाद्या मागास प्रवर्गाचा उमेदवार उपलब्ध झाला नाही तर होणारे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी इतर अन्य उपलब्ध मागास प्रवर्गातील उमेदवाराचा मुलाखतीमधील प्राविण्यावर आधारीत तात्पुरत्या नियुक्तीसाठी विचार करण्यात येईल.

८. उपरोक्त आरक्षित पदसंख्येमध्ये संस्थेने परस्पर बदल केल्यास मान्यता स्तरावर उदभवणा—या अडचणीस संबंधित संस्था जबाबदार राहील.

९. सदरची जाहिरात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर (**www.unishivaji.ac.in**) अर्जदारांना पाहणीसाठी उपलब्ध आहे.

१०. इच्छुक उमेदवारांनी दि. ............. रोजी ................ वाजता अर्ज व आवश्यक त्या मूळ कागदपत्रासह व झेरॉक्स प्रतींसह संस्था/महाविद्यालयात उपस्थित रहावे.

**स्थळ:**

**दिनांक :**

APPROVED
Dy. Registrar
Special Cell
Shivaji University, Kolhapur

प्राचार्य
श्री शिव—शाहू महाविद्यालय
सरुड, ता.शाहूवाडी, जि.कोल्हापूर